# ८. वाट पाहताना - अरुणा ढेरे

होळीनंतर थंडी झपाटयानं कमी होत जायची आणि आंब्यावर मोहोर नुसता घमघमत असायचा. परीक्षा तोंडावर आलेली असायची. मोकळ्या अंगणात अंथरूणं पडायची ती सुट्टी लागल्यावर; पण मार्च-एप्रिलमध्ये आम्हाला गॅलरीत झोपायला मिळायचं.

रात्रीचे मऊगार हात अंगावर फिरायला लागले, की झोपेची गडद चाहूल यायची. डोळे मिटताना मनात एकच संदेश जागा व्हायचा, 'उद्या कोकिळेचं 'कुहू' ऐकू येईल का ? बघू हं!' पहाटे पहाटे गाढ झोपेत असतानाच तो 'कुहूSकुहूS' आवाज कानावर यायचा आणि त्या आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक होऊन जायचं.

सुट्टीची वाट पाहणं तर तेव्हापासून सुरु झालेलंच असायचं. अभ्यासाचा आळस नसायचा. पाठांतर आवडायचं. नेमलेली पुस्तकं गोष्टीच्या पुस्तकांइतकीच परत परत आवडीनं वाचली जायची; पण अभ्यासाचं वही-पुस्तकं जरा बाजूला झालं रे झालं, की सुट्टीची आठवण उसळी मारून वर यायची. ते अंगणातलं हजारी मोगऱ्याचं झाड, शनिवारवाडयात सकाळी सकाळी जाऊन वेचून आणलेली बकुळीची फुलं, माठातलं वाळा घातलेलं पाणी, आई-आत्यांची कुरडया-पापडयांची घाई, अंगणभर पडणारी वाळवणं, कैरीची डाळ आणि पन्हं, कधीमधी घरची परवानगी मिळाल्यावर चोखायला मिळणारे बर्फाचे गोळे, उसाचा ताजा रस आणि मुख्य म्हणजे खूपच खूप गोष्टीची आणि कवितांची नवी पुस्तकं...सुट्टीची किती वाट पाहत असू आम्ही!

(१) आकृतिबंध पूर्ण करा.

होळीनंतर घडणाऱ्या गोष्टी
- [ ]
- [ ]

(२) (i) घटना- रात्रीचे मऊगार हात अंगावर फिरायला लागले.

परिणाम - [ ]

(३) वाक्प्रचार ओळखा व वाक्यात उपयोग करा.

परीक्षा तोंडावर आलेली असायची.

(४) पुढील शब्दांच्या आधी 'अव' हा उपसर्ग लावून शब्द तयार करा.

१) गुण – --------------------

२) लक्षण – --------------------

(५) पारिभाषिक शब्द

१) Corporation – -------------------

२) Bench – -------------------

३) Academic Qualification – ------------------

(६) विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) मऊ * --------------

२) गार * --------------

३) धाकटा *

४) दूर *

(७) पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

१) दहाबारा -

२) सप्तसिंधू -

(८) **स्वमत -** तुम्ही सुट्टीत कोणकोणत्या गमती-जमती करता ते तुमच्या भाषेत लिहा.

परिच्छेद -२

पुस्तकांची वाट पाहण्यात एक गंमत होती. एक वेगळंच जग तिथे भेटत होतं. न पाहिलेले देश, न पाहिलेली माणसं, न अनुभवलेले प्रसंग, अनोळखी, तरीपण आपले वाटणारे. ओळखीचे धागे जुळणारे. न जुळणाऱ्या गोष्टीसुद्धा किती थक्क करणाऱ्या! म्हणजे, जग असंही असतं तर...! मला केवढं तरी नवेपण भेटत होतं आणि शब्दांची जादू कळत होती. मी वाचत होते त्या गोष्टी, तो इतिहास, ती गाणी कुणीतरी रचलेली होती. लिहिलेली होती. जे सुचलं, जे लिहावंसं वाटलं ते कसं लिहू शकली आहेत ही माणसं! मला भाषेची ताकद समजत होती. लेखकाच्या प्रतिभेची ताकद समजत होती म्हणून पुस्तकं वाचण्याची वाट पाहण्यात उन्हाळ्याच्या आधीचा काळ इतका वेड लावायचा की बस्स !

आणखी एक वाट पाहणं होतं पोपटांच्या थव्यांचं. आमच्या घरामागे एक मोठ्ठं उंबराचं झाड होतं. उन्हं तापण्याचे दिवस आले, की त्यांचे थवे उंबरावर येऊन उतरायचे. कशातरीच पानांचं, गाठीगाठीचं ते झाड तेव्हा पिक्या उंबरांनी आणि राघूंच्या हिरव्या पंखांनी इतकं सुंदर होऊन जायचं! मी वाट पाहायचे त्या थव्यांची. त्या लालसर गोड झालेल्या उंबरांची. माझ्या मनात जाग्या होणाऱ्या कितीतरी कवितांची...

पुढे मग कवितेचं बोट मी चांगलं घट्ट धरून ठेवलं. तिची माझी मैत्रीच झाली. आपण कधीपण, केव्हापण मैत्रिणीला हाक मारतो, तिच्याकडे धावतो, तिच्याबरोबर भान विसरून मनातलं वाट्टेल ते बोलतो. इथे फक्त एक फरक होता. तिला हवं तेव्हा ती माझ्याकडे यायची. कधीही रात्री-मध्यरात्रीसुद्धा; पण मला मात्र कधीकधी खूप वाट बघायला लावायची. मी हाक मारल्यावर हमखास येईलच असं नसायचं कवितेचं. मग तिची वाट पाहणं-अस्वस्थ होणं-कशातच मन लागेनासं होणं-आई, आत्याची ती बोलणी खाणं! आज ते वाट पाहणं आठवलं तरी मी पुन्हा हुरहुरते. उंबराच्या पिकल्या फळांवर पोपटांचे हिरवे पंख पुन्हा उतरून यावेत, असं उगाच वाटत राहतं.

(१) आकृतिबंध पूर्ण करा.

पुस्तकांच्या वेगळया जगात लेखिकेला भेटलेल्या गोष्टी

(२) उंबराच्या झाडाची वैशिष्ट्ये :

१. -------------------------- २. --------------------------

३. -------------------------- ४. --------------------------

(३) पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा.

कधीही रात्री-मध्यरात्रीसुद्धा; पण मला मात्र कधीकधी खूप वाट बघायला लावायची.


(४) परिच्छेदातील दोन अभ्यस्त शब्द शोधून लिहा.

(५) **स्वमत -** पुस्तकांची वाट पाहण्यातली गंमत लेखिकेच्या अनुभवाच्या आधारे तुमच्या शब्दात स्पष्ट करा.


## संपूर्ण पाठावर आधारित प्रश्न

**१) आकृती पूर्ण करा.**


१)





२)





३)





४)




५)




६)




७) पोस्टमनची गुणवैशिष्ट्ये 

८)



## २) वाक्य पूर्ण करा.

१) एखाद्या गोष्टींची वाट पाहायला लागते तेव्हाच ...

२) कित्येक मोलाच्या गोष्टी सहज मिळाल्या तर ...

३) जे हवं ते सहज हाती येऊच नये तरच ...

## ३) कारणे शोधा.

१) आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक व्हायच कारण ...

२) पुस्तकांची वाट पाहण्यात एक गंमत होती कारण ...

३) आई, आत्याची बोलणी खावी लागत, कारण ...

४) म्हातारीच्या तोंडावर समाधान पसरायचं, कारण ...

५) दरवेळी पोस्टमन मनानंच कोरं पत्र वाचत असतो, कारण ...

६) पुस्तक वाचण्याची वाट पाहण्यात उन्हाळ्याच्या आधीचा काळ लेखिकेला वेड लावायचा कारण ...